# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-२६/२०२५** **दिनांक- १७/०१/२०२५**

## प्रेस नोट

### अनाधिकृतरित्या नवघर, काशिगांव व नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीत वास्तव्यास असलेल्या ०१ पुरुष व ०४ बांगलादेशी महिला नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १६/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत १) नवघर पोलीस ठाणे हद्दीतील होली कॉम्पलेक्स, पंप रुम, युरेका क्लासेस जवळ, दिपक हॉस्पीटलच्या पाठीमागे भाईंदर पुर्व, २) काशिगांव पोलीस ठाणे हद्दीतील वेस्टन पार्क बस स्टॅन्ड, वेस्टन पार्क, काशिगाव, काशिमिरा, या ठिकाणी बांगलादेशी नागरीक वास्तव्यास आहेत तसेच ३) नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील एल.बी.एस रोड, अस्मीता क्लब नयानगर मिरारोड पुर्व या ठिकाणी कामासाठी बांगलादेशी नागरीक येतात अशी बातमी मिळाली असून ते विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी ०७.४५ वा. ते १३.२० दरम्यान वेगवेगळे साफळे रचुन ०१ पुरुष व ०४ महिला असे एकुण ०५ बांगलादेशी नागरीकांना पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करुन त्यांनी ते बांगलादेशी नागरीक असल्याचे कबुली दिल्याने सदरबाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे यांनी सविस्तर पंचनामा केला असुन ताब्यात घेतलेल्या १) ०१ महिला बांगलादेशी नागरीक यांचेविरुध्द नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ३०/२०२५ २) ०१ पुरुष व ०१ महिला असे ०२ बांगलादेशी नागरीक यांचेविरुध्द काशिगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ३१/२०२५ व ३) ०२ महिला बांगलादेशी नागरीकाविरुध्द नयानगर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक २०/२०२५ असे एकुण ०५ बांगलादेशी नागरीकाविरुध्द फिर्याद दिल्याने पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४-अ (ब) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई मा. श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील,

पोशि/चेतनसिंग राजपुत, पोशि/केशव शिंदे, मपोशि/अश्विनी भिलारे, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर तसेच मपोहवा/ नम्रिता यादव, नेम- मनुष्यवध पथक, गुन्हे शाखा, मपोशि/जयवंती वसावे, नेमणुक- प्रशासन विभाग, गुन्हे शाखा यांनी केली आहे.




-----oooo----